**संच : ब**

# शिक्षकांसाठी सूचना तिसरी : मराठी

## पायाभूत चाचणी : २०१७-१८

**इयत्ता - तिसरी**

**विषय : मराठी**

**लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : ३०**

**प्रश्न १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द सांगताना मोठ्याने वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्याला शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) चाकर | २) गर्दन |
| ३) भिकारी | ४) मात्र |
| ५) धुसर | ६) शक्कल |
| ७) कैवारी | ८) पेंढी |
| ९) पोस्टर | १०) बॉल |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना खालील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'कैवारी' ऐवजी 'कइवारी' किंवा 'भिकारी' ऐवजी 'भीकारी'/ भीकारि असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २ ते ४ साठी) हा उतारा वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान :**

**प्रश्न २) क)** गावी (गुण १)

**प्रश्न ३)** तिने वाचण्यासाठी गोष्टींची पुस्तके सोबत आणली होती. (गुण २)

**प्रश्न ४)** झाडे, विहिरी, पाऊस याबद्दलच्या गमती जमती ऐकून तिला मजा वाटली. (गुण २)

**प्रश्न ५) चौकटीत लपलेल्या कोणत्याही पाच प्राण्यांची नावे शोधून लिही.** (गुण ५)

उदा. बैल, गाय, हरिण, वाघ, सिंह, शेळी, जिराफ, गवा, घोडा इत्यादी.

यापैकी कोणत्याही पाच अचूक उत्तरास गुणदान करावे. ('हत्ती' या शब्दासाठी गुणदान करू नये.)



*Runa GraphicsCom. 1/F/ Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 Sankalit / Marathi/Teachers For Instructions / Std. 3/ Proof -II/ 19-06-2017/ G/S*

# संच : ब

**प्रश्न ६)** रोहन पेरू खातो. (गुण १)

**प्रश्न ७)** कुणालकडे तीन पुस्तके होती/आहेत. (गुण १)

**प्रश्न ८)** रमेश गावाकडून गहू, तांदूळ व ज्वारी घेऊन आला. (गुण १)
(गहू नंतर स्वल्पविराम व आला नंतर पूर्णविराम दिल्यास प्रत्येक विरामचिन्हाला अर्धा गुण याप्रमाणे एक गुण.)

**प्रश्न ९) 'सरसर' शब्दाचा वापर केलेले कोणतेही अर्थपूर्ण वाक्य असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न १०) 'पोहणे' या शब्दाचे योग्य रूप वापरून वाक्य लिहिलेले असल्यास एक गुण द्यावा.** (गुण १)

**प्रश्न ११) कामाबद्दल पाच प्रश्न विचार. ते खाली दिलेल्या जागी लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन

**उद्दिष्ट :** हा प्रश्न मुलांचे प्रश्न कौशल्य तपासण्यासाठी आहे.

**गुणदान :**
- सर्व वाक्ये प्रश्नार्थी आहेत आणि सर्व वाक्यांच्या शेवटी प्रश्नचिन्हे दिली आहेत याची खात्री करावी.
- तसेच प्रश्न चित्रातील व्यक्तींच्या कामाशी संबंधित आहेत याची खात्री करावी.
- एकाच स्वरूपाचे जास्त प्रश्न विचारल्यास त्या सर्व प्रश्नांना मिळून एकच गुण द्यावा.
  उदा. एका डझन केळीचे किती रुपये घेता? दोन डझन केळीचे किती रुपये? इत्यादी.
- प्रत्येक बरोबर प्रश्नास एक गुण द्यावा. प्रमाण लेखनाची अपेक्षा करू नये.
- प्रश्नचिन्ह नसल्यास एकूण गुणांपैकी अर्धा गुण कमी करावा.

**प्रश्न १२) खालील चित्र पहा आणि त्यावर एक गोष्ट लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखी)

**उद्दिष्ट :** मुलांची अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :** लेखन नियमांनुसार तपासू नये.

| गुण | निकष |
|---|---|
| ० | केवळ शब्द लिहिणे किंवा काहीही न लिहिणे. |
| १ | यांत्रिकरित्या एकच वाक्य शब्द बदलून लिहिणे किंवा सुसंगत नसणारे विस्कळीत लेखन. |
| २ | त्रोटक किंवा अर्ध्यामुर्ध्या शब्दातील लेखन. वाक्यरचना काही ठिकाणी तरी नीट आहे. |
| ३ | संपूर्ण चित्राचा एकत्र विचार करून सलगपणे केलेले अर्थपूर्ण लेखन. पण गोष्ट असेल असे नाही. |
| ४ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. |
| ५ | चित्राच्या तपशिलात भर घालून, चित्रातील पात्रांना नावे देऊन गोष्ट लिहिली आहे. पात्रांच्या तोंडी संवाद/बोलणे घातले आहे. |



*Runa GraphicsCom. 1/F/ Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 Sankalit / Marathi/Teachers For Instructions / Std. 3/ Proof -II/ 19-06-2017/ G/S*

**संच : ब**

**तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना** **एकूण गुण : १०**

**तोंडी प्रश्न १) खालील उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे.** (गुण ५)

**प्रश्नकर्त्यासाठी सूचना :**

- हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसात चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना** : हा उतारा व्यवस्थित वाच. वाचून झालं की मी तुला काही प्रश्न विचारणार आहे. त्याची तू उत्तरं द्यायची.

**उतारा :**

**सेनापती बापट हे थोर समाजसेवक होते. ते नेहमी चौकटीच्या कापडाची आखूड विजार तसाच कुर्ता आणि टोपी असे कपडे वापरत. लोक त्यांना विचारत, ‘‘तुम्ही असे तुरुंगातल्या कैद्यासारखे कपडे का वापरता?’’ सेनापती बापट म्हणत, ‘‘अरे, आपला सारा देशच तुरुंग झाला आहे. इंग्रज आपल्या देशावर हुकूमत करतात. आपल्याला गुलामासारखे वागवतात. म्हणजे आपण कैदीच नाही का?**



*Runa GraphicsCom. 1/F/ Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 Sankalit / Marathi/Teachers For Instructions / Std. 3/ Proof -II/ 19-06-2017/ G/S*

## संच : ब

**वाचनासाठी गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही, वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

| | गुण | योग्य उत्तर |
|---|---|---|
| **तोंडी प्रश्न २) सेनापती बापट हे कोण होते? योग्य पर्याय सांग.**<br>अ) मंत्री<br>ब) समाजसेवक<br>क) शिक्षक | (१) | (ब) |
| **तोंडी प्रश्न ३) सेनापती बापट कोणता वेश वापरत हे उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून समजते ते वाक्य सांग.** | (२) | |
| **तोंडी प्रश्न ४) आपण सारे कैदी आहोत असे सेनापती बापट का म्हणत?** | (२) | |

■■■



*Runa GraphicsCom. 1/F/ Question Paper/ Payabhut Chachani 2017-18 Sankalit / Marathi/Teachers For Instructions / Std. 3/ Proof -II/ 19-06-2017/ G/S*